श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा कामाची जाहीर निविदा.</u>

चैत्र यात्रा कालावधीत शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा करणेकामी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व निविदा फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमूना फॉर्ममध्येच निविदा भरून देणेची आहे. तसेच अनामत रक्कम रू.५,०००/–डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद निविदा कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दिनांक ०६/०४/२०१६ रोजी सं.११.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त निविदा दिनांक ०६/०४/२०१६ रोजी तुकाराम भवन येथे सं.११.०० वा. उघडल्या जातील.

क्र.जमीन विभाग/कावि/२१०/२०१६ दि.२५/०३/२०१६

सही XXX

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६–२२३५५०,

९४२२०१५६९१, ९४२१०४०३२४)

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

**निवीदा फॉर्म**

शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा कामाची जाहीर निविदा

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः— शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा कामाचे दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.—————————————————————————

पूर्ण पत्ता :— —————————————————————————

—————————————————————————

मोबाईल कं.:— —————————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा कामाची दिनांक २५/०३/२०१६ रोजीचे दैनिक दिव्य मराठी, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदे प्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| **अ क्र** | **तपशील** | दर (रू.) प्रति नग |
|---|---|---|
| १ | शुध्द थंड पाण्याचा जार (१८ लिटर) | |

सदर दराने १४ ते १८/०४/२०१६ या कालावधीत शुध्द थंड पाण्याचा जार पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.५,०००/— अनामत रकमेचा डी.डी./पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे शुध्द थंड पाण्याचा जार पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /०४/२०१६ पुरवठाधारकाची सही

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी शुध्द थंड पाण्याचा जार पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वतःच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. सदर कामासाठी आवश्यक असलेल्या शासकीय परवान्यांच्या प्रती.

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा कामाची जाहीर निविदा**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. नमूना निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. निविदा फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि निविदा शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा करणे कामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. निविदा समक्ष तुकाराम भवन येथे सादर कराव्यात किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने १४ ते १८/०४/२०१६ या कालावधीत शुध्द थंड पाण्याचे जार पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | आवश्यक गुणवत्ता | अंदाजे लागणारे जार |
|---|---|---|
| शुध्द थंड पाण्याचा जार (१८ लिटर) | उत्तम | ३०००नग |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच जारचा पुरवठा करणेचा आहे.

६. थंड पाण्याच्या जारची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे.

७. सदर कामाची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

९. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१०. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

११. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१२. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण दर्शनरांगेत एकविरा देवी मंदिर, चंद्रभागाघाट व पत्राशेड येथे करणे आवश्यक आहे.

१३. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१४. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१५. निविदा ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१६. प्रशासकीय व अन्य कारणास्तव निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१७. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१८. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

१९. निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.